# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०६/२०१६.

**१) विश्वासात घेवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०९/०२/०१६ ते दि. १०/०५/०१६ रोजी १३.०० वा. दरम्यान पाचही आरोपीतांनी लोकमत वर्तमान पत्रात राष्ट्रीय ग्रामीण फोरजी टॉवर लिमीटेड या कंपनी कडुन शेतात व छतावर टॉवर लावण्याकरीता ६५ लाख अॅडव्हान्स व ६५,०००/—रु. भाडे व नोकरी अशी जाहीरात दिली यावरुन उमेश शंकरराव कावरखाने रा. शुक्रवारी भंडारा यांना विश्वासात घेवुन दि. ०९/०२/२०१६ पासुन वेगवेगळया बॅकेत वेगवेगळया खात्यावर दि. १०/०५/२०१६ पर्यंत पैसे भरण्यास सांगुन ४५,०००००/—रु. चे आमिष दाखवुन ६,३३,८००/—रु. भरणा करण्यास सांगुन त्यांना विश्वासघात करून फसवणुक केली. असे चौकशी अहवाला वरुन सर तर्फे फिर्यादि पोहवा. साकुरे पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,४०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साकोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) शुल्लक कारणावरून मारहान केली. :—**

दिनांक २८/०६/०१६ रोजी ११.३० वा. दरम्यान फिर्यादी सौ. कुसुम देवराम नेताम वय ५५ वर्ष, रा. दिघोरी व दोन्ही आरोपी हे एकमेकांच्या घरा शेजारी राहतात. त्याच्यांत दि. २३/०६/२०१६ ला नळाचे पाणी भरण्यावरुन किरकोळ भांडण झाले होते, त्या भांडणावरुन आरोपीचा पती हा आपल्या जागेवर कुंपन करित होता त्यामुळे फिर्यादीला जाण्या—येण्यास अडथळा होत होता, त्यासाठी फिर्यादीने मनाई केली म्हणुन आरोपींनी फिर्यादिसोबत भांडण केले व आरोपी क्र. १ हीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या बोटाला चावा घेतला व आरोपी क्र. २ ही फिर्यादीच्या अंगावर मारण्यास धावली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष**, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.